# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
# परभणी

जा.क्र.जीजीई/९५३ /२०२१ दिनांक : १८/०५/२०२१

## परिपत्रक

**विषय :** **वसंतराव नाईक जयंती निमित्त दि. १ जुलै २०२१ रोजी कृषि दिनी "वृक्षारोपन कार्यक्रम" आयोजित करण्यासाठी नियोजन व आढावा बैठकी बाबत...**

**संदर्भ :** मा.कुलगुरु, वनामकृवि, परभणी यांचे पत्र क्रमांक सीसीएम ३०/०७/२१, दि. ०५/०५/२०२१

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कार्यरत सर्व कृषि व संलग्न महाविद्यालये, कृषि तंत्र विद्यालये, कृषि विद्यालये, माळी प्रशिक्षण केंद्र, सर्व संशोधन केंद्रे, विस्तार कार्यालय तथा कृषि विज्ञान केंद्र यांच्या परिसरामध्ये मागील तीन वर्षापासुन मा. कुलगुरु, वनामकृवि, परभणी यांच्या नेतृत्वाखाली **"हरीत परिसर सुंदर परिसर"** ही चळवळ उभी राहिली आहे.

आपण आगामी वर्ष हे विद्यापीठाचे **"सुवर्ण महोत्सवी वर्ष"** त्याचबरोबर १ जुलै २०२१ रोजी कृषि दिन ही साजरा करणार आहोत. शासन स्तरावरुन आणि विशेषतः महाराष्ट्राचे मा. राज्यपाल कार्यालयातून सूचित केल्यानुसार मा. कुलगुरु महोदय, वनामकृवि, परभणी यांनी संदर्भाधिन पत्राव्दारे हरीत चळवळ अधिक प्रभावी आणि सर्व व्यापी स्वरुपात राबविण्याच्या दृष्टीकोनातून याही वर्षी आपल्या विद्यापीठ परिसरात मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करावयाची असल्याबाबत मार्गदर्शनपर आवाहन केलेले आहे. त्या सूचनांचे यथायोग्य पदधतीने नियोजन करण्यासाठी व या पूर्वी लागवड केलेल्या वृक्षांची निगा व जोपासना करण्याबाबत **दिनांक २१/०५/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता** सर्व संचालक/सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य/प्रभारी अधिकारी/ कार्यक्रम समन्वयक/प्राचार्य, इत्यादी यांची ऑनलाईन आढावा बैठक **मा. कुलगुरु डॉ. अशोक ढवण,** वनामकृवि, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्याचे निश्चीत करण्यात आलेले आहे.

तरी आपणास विनंती करण्यात येत आहे की, **"हरीत परिसर सुंदर परिसर"** या चळवळीसाठी पूर्वी लागवड केलेल्या वृक्षांची निगा व संवर्धन आणि वसंतराव नाईक जयंती व कृषि दिनाचे औचित्य साधून आगामी पावसाळी हंगामात नविन वृक्षारोपन/वृक्ष दिंडी कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उपरोक्त प्रमाणे नियोजन व आढावा बैठकीस सर्व संचालक यांनी वैयक्तिक उपस्थित राहून त्यांच्या अधिनिस्त सर्व प्रभारी अधिकारी / संशोधन केंद्रे / कृषि विज्ञान केंद्रे यांना उपस्थित राहण्याच्या त्यांच्या स्तरावरुन सूचना द्याव्यात.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने व आदेशावरुन.

**संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता**
**(कृषि)**

**प्रत : माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव**

१. संचालक संशोधन / विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी.
२. सर्व सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, कृषि / कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान / अन्नतंत्र / सामुदायीक विज्ञान / उद्यानविद्या / कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय / कृषि पणन व व्यवसाय व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, परभणी / लातूर / उस्मानाबाद / अंबाजोगाई / बदनापूर / गोळेगांव / चाकूर यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त बैठकीस उपस्थित रहावे.
३. कुलसचिव / विद्यापीठ अभियंता / नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव
४. सर्व विभाग प्रमुख, कृषि महा., परभणी. यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त बैठकीस उपस्थित रहावे.
५. डॉ.एच.व्ही. काळपांडे, प्राध्यापक, कृषि वनस्पतीशास्त्र व समन्वय अधिकारी, वृक्षारोपन लागवड / विद्यार्थी कल्याण अधिकारी / प्रभारी अधिकारी, उती संवर्धन, / विद्यापीठ ग्रंथालय / पीक लागवड व खर्च काढण्याची योजना, वनामकृवि, परभणी यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त बैठकीस उपस्थित रहावे.
६. डॉ. पी.एस. कापसे, विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी तथा सहाय्यक प्राध्यापक, कृषि विस्तार, परभणी यांना देऊन सूचित करण्यात येते की, उपरोक्त ऑनलाईन बैठकीसाठी लिंक तयार करुन या कार्यालयाच्या मान्यतेने सर्व संबंधीताना बैठकीपूर्वी कळविण्यात यावे.
७. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव व विनंती करण्यात येते की, कृपया सदरचे परिपत्रक मा.कुलगुरु महोदय यांचे निदर्शनास आणून द्यावे.